# अथांग

मूळ नेपाळी कादंबरी ‘अथाह’

## बिंद्या सुब्बा


मराठी अनुवाद

आसावरी काकडे

मोहन ठकुरी यांच्या प्रस्तावनेतून-

या कादंबरीच्या पार्श्वभूमीवर एक मनोरुग्णालय आहे आणि तिथलेच मनोरुग्ण यातली पात्रं आहेत. पण ही कथा या रोगाची किंवा रोग्यांची नाहीए. विस्कटून विकृत झालेल्या, वास्तव जगाशी संपर्क तुटलेल्या असहाय मनांच्या आक्रोशांची कथा आहे ही. त्यात जाणीव गमावलेल्या अनियंत्रित मनांचा प्रवाहही सामावलेला आहे. हे सर्व समजून घ्यायला विशेष संवेदनशील मन हवं.

सूक्ष्म संवेदनशीलतेनं भारलेल्या या कादंबरीची भाषा सभ्य आणि सुंदर आहे. कथनशैलीही वाचकाला धरून ठेवणारी आहे. या शैलीनंच माझ्यातला वाचक भारावून गेलाय. माझा सलाम आहे बिंद्या सुब्बा यांच्या लेखणीला आणि कादंबरीत व्यक्त झालेल्या त्यांच्या संवेदनशील दृष्टिकोनाला.

वर उल्लेख केलेल्या गोष्टींखेरीज, कादंबरीत व्यक्त झालेल्या लेखिकेच्या भावनांची मी प्रशंसा करतो. निसर्ग आणि डोंगररांगांविषयीचं तिचं प्रेमही या कादंबरीत अभिव्यक्त झालंय. कादंबरी वाचताना या सुंदर अभिव्यक्तीच्या आस्वादाचा आनंद आपण अवश्य घ्यावा, अशीही इच्छा आहे.

कादंबरीकार बिंद्या सुब्बा यांच्या लेखणीतून अशाच सुंदर साहित्यकृती सातत्यानं निर्माण होवोत यासाठी त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा.

मोहन ठकुरी.

बोगनवेलीच्या फांद्या बाजूला करत मी त्या प्रशस्त घराच्या प्रांगणात प्रवेश केला. इकडं-तिकडं बघत कुणाला काही विचारणार इतक्यात बरोबर माझ्या डोक्याच्या वर असलेल्या खिडकीतून डोकावणाऱ्या दोन डोळ्यांशी माझी नजरभेट झाली. काही क्षण निरखल्यावर ओळखायला मला वेळ लागला नाही- हेच ते मोहक डोळे ज्यांच्यासाठी संमोहित होऊन खेचल्यासारखी मी इथवर आले. हातातल्या छोट्याशा डायरीत लिहिलेला पत्ता पाहिला आणि मोठ्या दरवाजावरची चमकती पितळी पाटी पाहिली.. मी योग्य ठिकाणी पोहोचले होते. पाटीवर लिहिलेलं होतं- श्री सुबोध कुमार...

दरवाजावर कॉलबेल होती, दाबण्यासाठी हात वर गेला खरा, पण थांबला.. वाटलं, मी का आलेय इथं? काय आवश्यकता होती मला इथं येण्याची? माझ्या येण्याचं काय कारण सांगणार होते मी? त्यासाठी माझ्याजवळ काहीच ठोस आधार नव्हता.. आल्यापावली परत मागं फिरावं असं वाटलं. पण वरच्या खिडकीतून पडद्यामागून ते मोठे मोठे डोळे माझ्याकडं पाहात होते. पूर्वी अत्यंत सुंदर वाटलेले ते डोळे मला आज हरणाच्या नजरेसारखे भयभीत वाटले. त्या डोळ्यांनी मला पुन्हा प्रेरीत केलं आणि अचानक माझ्या हातानं दरवाजावरची कॉलबेल दाबली. पण परत वाटलं उगीच दाबली की काय... असं काही मनात येतच होतं तोपर्यंत दरवाजा उघडला गेला. दारात एक मुलगी दिसली. पेहेरावावरून ती नोकर असावी असं वाटलं.

‘कोण पाहिजे?’

माझ्या अपरिचित चेहऱ्यावर तिनं एक प्रश्नचिन्ह उमटवलं!

कोण पाहिजे- प्रीती की सुबोधबाबू? व्दिधा मनःस्थितीत मी अचानक विचारलं, ‘सुबोधबाबू आहेत?’

‘हो, आहेत ना. या आत, बसा.

हॉलमधे बसायला सांगून ती आत निघून जाते. बसल्या बसल्या मी हॉलचं निरीक्षण करतेय. इथल्या सगळ्या वस्तू मौल्यवान आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या वाटतायत. तैलचित्रांच्या दोन मोठ्या फ्रेम्स आणि कोपऱ्यात ठेवलेली एका युवतीची धातूची मूर्ती दिवाणखान्याची शोभा वाढवतेय. हे एकत्र कुटुंब आहे असं ऐकलं होतं पण इथं जास्त माणसं असतील असं वाटत नाहीए. फारसा आवाज नाहीए कुणाचा. बरीच वाट पाहिल्यानंतर पांढरा कुर्ता आणि पायजमा घातलेले, डोळ्यांवर सोनेरी फ्रेमचा चष्मा असलेले, भारदस्त व्यक्तिमत्वाचे एक गृहस्थ दिसले.

त्यांना पाहताच मी उत्स्फूर्तपणे उठून उभी राहिले. त्यांच्या चेहऱ्यावर माझ्या परिचयाविषयीचं एक मोठं प्रश्नचिन्ह उमटलेलं दिसलं.

‘सुबोधबाबू आपणच का?’

हात जोडून नमस्कार करत मी विचारलं. बसण्यासाठी खूण करत ते म्हणाले, ‘हो, पण मी आपल्याला ओळखलं नाही’

कुणी महिला बाहेर वाट पाहतेय असं त्यांना सांगितलं गेलं तेव्हा कदाचित त्यांनी कल्पना केली असेल की एखाद्या खानदानी घरातली किंवा एखाद्या मान्यवर संस्थेकडून आलेली कुणी महिला असेल. पण माझ्याकडं बघताच त्यांच्या चेहऱ्यावर काहिशी नापसंती उमटल्यासारखं मला वाटलं. मग नकळत मीही स्वतःकडं पाहिलं- एका साध्या सिंथेटिक साडीत गुंडाळलेला देह, उकाड्यानं घामेजणार म्हणून क्रीमही न लावलेला चेहरा, कसेतरी एकत्र करून खोपा केलेले केस आणि हातात रंग उडालेली छत्री...

पुन्हा एकदा वाटलं कशाला आलेय मी इथं.. पण बसून राहिले. म्हटलं की मी नर्सिंगहोमची विद्यार्थिनी आहे. काही दिवसांपासून मी मनोरुग्णालयात कामाला आहे. प्रीती माझी पेशंट होती. साइकीयाट्री विषयामधे मला रस आहे म्हणून तिच्याविषयी जाणून घ्यायला आले आहे.

हेही तुमच्या अभ्यासक्रमात आहे म्हणून किंवा कामाचा भाग म्हणून तुम्ही आलायत की सहज औपचारिकता म्हणून..?

इथं आले ते बरोबर झालं की चुकलं या संभ्रमात मी आधीच गोंधळले होते.. आता या प्रश्नानं तर माझा थरकापच उडाला. तसंही माझ्या या निरर्थक उद्योगासाठी मला वरिष्ठांच्या प्रश्नांना तोंड द्यावं लागण्याची शक्यता होतीच.. मी तर केवळ निरागस प्रेम आणि उत्कट भावनावेगांनी ओढून आणल्यासारखी आले होते..

‘नाही.. हे अभ्यासक्रमात नाहिए. पण एक रुग्ण आणि परिचारिका यांच्यातलं नातं आणि या विषयाचा सखोल अभ्यास करण्याची तळमळ या प्रेरणेतून मी इथं आलेय. आपल्याला माझ्यामुळं त्रास होतोय याबद्दल क्षमा असावी.’

‘आता काय हवंय तुम्हाला?’ आवाजातली नाराजी जरा कमी झालीय...

‘फक्त तिच्या स्वास्थ्याविषयी जाणून घ्यायचंय’...........